दिवाणी दावा क्र. 19/2012
स.अहमद वि. गंगुबाई
नि. 124

**<u>आदेश नि. 124 वर</u>**

वादी याने सदरचा अर्ज हा दावा कलम 10 दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार स्थगीत करावा म्हणुन अर्ज केला आहे.

02. वादीने अर्जात असे म्हटले आहे की, या केसमधील मिळकत व या केसमधील पक्षकार यांच्यामध्ये मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याची क्र. 2174/2012 व 2683/2012 हया प्रलंबीत आहे. सदर दाव्याचा संबंध सदर याचीकांशी आहे, त्यामुळे हा स्थगीत करावा, म्हणुन विनंती केली आहे.

03 प्रतिवादीतर्फे सदर अर्जाला विरोध करण्यात आलेला आहे व प्रतिवादी क्र. 1 हि वयोवृध्द् आहे व प्रकरणाचा निकाल लागणे गरजेचे आहे व वादी जाणुन बुजुन प्रकरण लांबवीत आहे व वादी पुरावा देत नाही, म्हणुन प्रकरण फेटाळण्यात यावे तसेच अर्जदाराचा अर्ज टेनेबल नाही. दावा 2010 मध्ये दाखल करण्यात आलेला आहे व तेव्हा पासुन प्रलंबीत आहे. वादी पुरावा देण्यातसाठी भरपुर संधी घेतलेली आहे, अर्जदाराचा अर्ज मोघम आहे व अर्जासोबत कोणतेही शपथपत्र दाखल नाही. याचीकेचे अधिकार क्षेत्र वेगळे आहे, तसेच दावा मिळकत वेगळी आहे, दावा मनाई हुकुमाचा आहे व दाव्यामध्ये छोटया स्वरूपाचा मुद्दा आहे, दाखल याचीका ताब्या संबंधीच्या नाही. तसेच मा. उच्च न्यायालय याचीकेमध्ये ताब्याचा मुद्दा निकाली काढणार नाही. वादी दावा लांबविण्याचा प्रयत्न करीत आहे. कलम 10 तरतुदींची पुर्तता होत नाही. वादीने केलेला अर्ज मंजुर होण्यास पात्र नाही, महणुन अर्ज नामंजुर करावा, व प्रतिवादीला नुकसान भरपाई म्हणुन रूपये पाच हजार दयावे, अशी विनंती केली आहे.

04. वादीचा वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला वादीच्या वकीलांनी वादीकडे टेनंसी प्रमाणपत्र आहे व प्रतिवादी गंगाबाई हिने मालकी हक्क क्लेम केला आहे. त्यावर वादीने एम.आर.टी येथे अपील कले होते व ते मंजुर झाले आहे व त्या विरूध्द गंगाबाईने मा. उच्च न्यायालयात याचीका दाखल केली आहे. तसेच दुस–या याचीकेमध्ये मालकी हक्क प्रमाणपत्र चालेंज केले आहे. दरम्यान गंगाबाईने दहा लोकांना दावा मिळकत विक्री केली आहे, त्यामुळे दहा लोका विरूध्द हा दावा दाखल केला आहे. नि. 05 चा अर्ज मंजुर झालेला आहे. दावा मिळकत एकच आहे. तसेच दाव्यातील पक्षकार सारखे आहे. मालकी हक्काबाबतचा मुद्दा मा. उच्च न्यायालयाकडे प्रलंबीत आहे म्हणुन याचीका दाखल असल्यामुळे हा दावा स्थगीत करावा अशी विनंती केली आहे.

05. प्रतिवादीच्या वकीलांनी वादीचा दावा मनाई हुकुमाचा आहे व दोन्ही याचींकामध्ये या दाव्याला स्थगीती नाही, तसेच दावा जुना आहे व दिनांक 13.06.2011 पासुन दावा पुराव्याला लागलेला आहे, असा युक्तीवाद केला तसेच नि. 127 चा लेखी युक्तीवाद देखील सादर केला आहे त्याचे वाचन करण्यात आले.

06. नि. 01 चे वाचन करण्यात आले. नि. 01 मध्ये वादी यांनी दावा मिळकत सर्वे क्र. 149 मधील 26 एकर 20 गुंठे या दावा मिळकती संबंधी मनाई हुकुमाचा दावा दाखल केला आहे. वादी यांच्याकडे कलम 38 'ई' हैद्राबाद टेनंसी कायदयाप्रमाणे प्रमाणपत्र आहे व त्यानुसार फेरफाराची नोंद झालेली आहे. प्रतिवादी गंगुबाई हिने जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रकरण दाखल केले होते व जिल्हाधिकारी यांनी दिनांक 06.04.2010 रोजी तिचा अर्ज मंजुर केला आहे, त्या विरूध्द वादी यांनी एम.आर.टी औरंगाबद यांच्याकडे अपील दाखल केली आहे व एम.आर.टी औरंगाबाद यांनी जैसेथे परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिलेले आहे. या प्रकरणामध्ये नि. 05 चा अर्ज न्यायालयाने मंजुर केला असुन प्रतिवादी यांना वादीच्या दावा मिळकत ताब्यास हरकत करू नये असा तात्पुर्ता मनाई हुकुम दिनांक 13.04. 2011 रोजी दिलेला आहे. प्रकरणामध्ये दिनांक 13.06.2011 रोजी मुद्दे काढण्यात आले असुन वेळोवेळी विवीध अर्ज आलेले आहे व दिनांक 18.06.2013 रोजी हा अर्ज देण्यात आलेला आहे.

07. वादीतर्फे दाखल याचीका क्र. 2683/2012 च्या प्रमाणित प्रतिचे वाचन केले सदर याचीका प्रतिवादी गंगाबाई हिने वादी व इतर लोकांविरूध्द दाखल केले आहे. व सदर याचीका एम.आर.टी औरंगाबाद यांनी दिलेल्या निकाला विरूध्द दाखल करण्यात आलेले आहे. सदर याचीकेमध्ये दावा मिळकत सर्वे क्र. 149 मधील 8 हेक्टर 26 आर जमीनी संबंधी आहे. त्यामध्ये एम.आर.टी औरंगाबाद यांनी पारीत केलेला आदेश रद्द करून मागीतलेला आहे. तसेच याचीका क्रमांक 2174/2012 याच्या प्रमाणीत प्रतिचे वाचन करण्यात आले. त्यामध्ये देखील प्रतिवादी गंगाबई हिने सदर याचीका दाखल केली आहे व कलम 38 'ई' टेनंसी कायदयानुसार देण्यात आलेल्या आदेशाबाबतीत प्रार्थना केली आहे व अतिरिक्त तहसिलदार परभणी यांनी दिनांक 07.05.1997 रोजी कलम 38 'ई' टेनंसी कायदयानुसार दिलेल्या मालकी हक्क प्रमाणपत्र रद्द करून मागीतले आहे.

08. वरील दोन्ही याचीकांमध्ये दावा मिळकत व पक्षकार सारखेच आहे तरी कलम 10 दिवाणी प्रक्रिया संहितेच्या तरतुदीच्या विचार केला असता, हा दावा दिनांक 23. 07.2010 रोजी दाखल करण्यात आलेला आहे व वरील दोन्ही याचीका 2012 मध्ये दाखल करण्यात आलेले आहे. कलम 10 नुसार याचींकासाठी कलम 10 चा वापर करता येणार नाही, असे न्यायालयचे मत आहे, तसेच प्रतिवादी गंगाबाई हिने दाखल केलेल्या याचीका एम.

आर.टी औरंगाबाद यांनी केलेल्या आदेशा विरूध्द व अतिरिक्त तहसिलदार परभणी, यांनी केलेल्या आदेशा विरूध्द आहे, तसेच सदर याचीकेमधील मुद्दा हा दिवाणी दावा निकाली काढतेवेळी अडचणीचा असल्याचे दिसुन येत नाही. तसेच कलम 10 दिवाणी प्रक्रिया संहितेच्या तरतुदीमध्ये वादी यांनी केलेला अर्ज बसत नाही. हा दावा मनाई हुकुमाचा आहे व दाव्यामधील मुद्दे काढण्यात आलेले असुन दावा पुराव्यासाठी प्रलंबीत आहे. वरील दोन्ही याचीका यांचा विचार केला असता, व या दाव्यामधील मुद्दयांचा विचार केला असता, याचीकांशी या दाव्यातील मुद्दयांचा व निघना–या निष्कर्षांचा अर्था अर्थी काही संबंध असल्याचे दिसुन येत नाही, वादीच्या वकीलांनी केलेला अर्ज व केलेला युकतीवाद व प्रतिवादीच्या वकीलांनी दिलेला खुलासा व केलेला युक्तीवाद व केसमधील संपुर्ण वस्थुस्थिती व कलम 10 दिवाणी प्रक्रिया संहितेची तरतुद व मा. उच्च न्यायालय औरंगाबाद येथे प्रलंबीत असलेल्या दोन्ही याचीका या सर्व बांबींचा विचार केला असता, वादीने केलेला अर्ज वरील कारणावरून मंजुर होण्यास पात्र नाही. महणुन हे न्यायालय खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

दिनांक 15.12.2015.

( अ.द.पुंडलीक )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
**पुर्णा.**